# ‘महामार्ग चौपदरीकरणातील नुकसानभरपाई द्यावी’

खेड-शिवापूर, दि. १३ (वार्ताहर) : केंद्र शासनाच्या रस्तेविकास प्रकल्पांतर्गत पुणे-सातारा महामार्ग चौपदरी रस्त्यासाठी खेड-शिवापूर विभागातील शेतजमिनी ताब्यात घेतल्या असून, त्या शेतजमिनींची नुकसानभरपाई त्वरित देण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेचे कार्यकर्ते श्री रमेश कोंडे यांनी केली

केंद्र शासनाने रस्ते सुधार योजनेंतर्गत पुणे-सातारा (राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार) महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे. रस्तारुंदीकरणासाठी खेड-शिवापूर (ता. हवेली) येथील महामार्गालगतच्या शेतजमिनी कामाअगोदरच ताब्यात घेऊन तशी संबंधित शेतकऱ्यांच्या सात-बारा उताऱ्यांवर नोंद केली आहे. महामार्ग चौपदरीकरणातील भोर तालुक्याच्या हद्दीतील काही शेतकऱ्यांच्या शेतजमिनींची नुकसानभरपाई देण्यात आली आहे. मात्र, खेड-शिवापूर (ता. हवेली) येथील शेतकऱ्यांना अद्याप नुकसानभरपाई देण्यात आलेली नाही. रस्ता चौपदरीकरणातील शेतजमिनींच्या मालकांना अगोदर नुकसानभरपाई व नंतरच शेतजमिनींचा ताबा घेऊन महामार्ग रुंदीकरणाचे काम करणे गरजेचे आहे; परंतु नुकसानभरपाई न देता रस्त्याचे काम सुरू केले आहे. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार संबंधित अधिकाऱ्यांनी स्थानिक शेतकऱ्यांच्या मदतीने गुंठ्याचे भाव ठरवून त्याप्रमाणे शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी, असा आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे. मात्र त्यानुसार कारवाई झालेली नाही.

योग्य नुकसानभरपाई न मिळाल्यास महामार्ग चौपदरीकरणाचे काम बंद पाडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

This PDF file is Created by trial version of 123 PDF Creator.
Please use purchased version to remove this message.